
कविता



# ऋण

खोंड म्हणून जन्माला आलो
धन्यालाही मुलगा झाला,
जन्मापासून मालकाने
दोघांचाही सांभाळ केला...

वाढवलं मलाही मुलाबरोबर
रुप दिसं गोजिरवाणं,
मूल खेळायचं माझ्याबरोबर
कुरवाळायचं मला प्रेमानं...

अधिक मिळे धन्याचं प्रेम
आईचं दूध पीत होतो,
अंगापिंडानं होतो भरत
दोघेही सोबत वाढत होतो...

धन्याचं मूल होतं शिकत
मी अन् धनी होतो राबत,
त्याच्या शिक्षणासाठीचा खर्च
मेहनत करून होतो जमवत...

मीही अगदी इमानदारीत
होतो धन्यासाठीही कष्टत,
धनी नाही दिसला तर
गोठ्यातच बसत होतो रडत...

वर्षांमागून वर्षे सरली
धन्याचं पोर साहेब झालं,
नोकरीच्या निमित्तानं
परदेशात निघून गेलं...

धनी माझा थकला होता
मलाही आता नव्हतं उठवत,
धनी माझ्याकडं, मी धन्याकडं
टक लावून होतो बघत...

धन्याचे सोबती येत होते
गप्पा मारत होते बसत,
मी मात्र एकटाच राहून
पूर्वीचे दिवस होतो आठवत...

एक दिवस असा उजाडला
धन्याचा मुलगा गावी आला,
तुम्हीही माझ्याबरोबर चला
असं धन्याला म्हणू लागला...

धन्याच्या डोळ्यात पाणी तरळलं
त्यानं एकदम माझ्याकडं पाहिलं,
मीही मानेनं दिला होकार
तसं माझं काय होतं उरलं?

धनी आला गोठ्यात धावत
माझ्या पाठीवर हात ठेवला,
मुलाच्या बोलावण्याला मात्र
त्यानं ठामपणे नकार दिला...

ज्याच्या कष्टांवर साहेब झालास
त्याची दैना नाही करणार,
तू आपला मजेत राहा
मी राजाची काळजी घेणार...

तुला आता पंख फुटले
उंच गगनात झेप घेशील,
पण राजाचे पाय थकले
त्याचे ऋण कसे फिटतील?

– निर्मला ठोंबरे
(मो.नं.९४२२९१६३०२)
मु.पो. लासलगाव,
ता. निफाड,
जि. नाशिक